# तांबुल विडा मंत्र

।। श्रीगणेशाय नमः।

।। श्री स्वामी समर्थः।।

तांबुल हा सुरस सत्व गुणांचा ठेवा।
विरजोनी मायेस दाखवी परमार्थाचा मेवा।।
नागवेलीचे पान करिसी प्रेमरुपी अच्छादान।
मारोनी दंभास सुखाचे करवी पिधान।।
शुभ्र चुना सुखाचे करोनी लिंपन।
दुःखास जाळोनी करवी दयेचे सिंचन।।
पुगीफल राहोनी त्यात दारिद्रया समान कठीण।
चावुनी तयासी मुक्ती देई कठीण त्या ऋणातून।।
वशीभूत करती वेलची त्या तांबुलातून।
गारवा देऊन खूश करविसी मनातून।।
सुखकारी दयाळू कृपाळू शतपुष्पा तयात।
आनंदी करोनी डुंबवी सुख समृद्धीच्या फेऱ्यात।।
नियतीने केला अमीरसाचा ठेवा।
तयातील खोबरे करुन घेई गुरुसेवा।।
घोर जादुटोणादि भरले आहे विश्वात।
कापराचा सुगंध बुझवी त्या फेऱ्यास।
स्तंभनादी क्रिया सारा व्यापार थांबवितात।
सोडण्या हेतूने मधुर कंकोळ भरले तयात।।
मारण उच्चाटन आहेत ज्या दुष्ट बुध्दीत।
तयातील तीळ दाखवी वाट या भ्रम विश्वात।।

मायाविश्वाचा आहे हा भला मोठाला साचा।
केशर करविसी अंगीकार येथेच सुप्रसिध्दीचा।।
भय व मनाचे विकार सदा करीसी विषण्ण।
तयातील कात सारेच करील छिन्न विछिन्न।।
आनंद खोलवी सुखसमृध्दीचे कीवाड।
तयातील ज्येष्ठमध पुरविसी हे भक्तांचे लाड।।
विडयातील सैंन्धव तांबूल करेल चविष्ट।
गुरुसेवेत राहूनी साध्य करेल अभिष्ट।।
तिखट लवंग बांधुनी राहती सर्वांस।
नाशविती दुष्ट अघोरी विद्या बाधेस।।
चर्तुर्दशगुणी तांबुल हा जणू प्रेमाचा सागर।
सेवन करीता स्वामी सेवेने भरी जीवन घागर।।
श्री स्वामी समर्थार्पणमस्तु
शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु